# जाहिरात मसुदा

**श्री.छत्रपती शाहु महाराज रुग्णालय,शाहु नगर महानगरपालिका दवाखाना सेवाभावी संस्था / कंपनी / व्यक्ती यांना चालविणेस देणेबाबत**

**मा.महासभा ठराव क्र.६४८ दिनांक २९.०४.२०१७ अन्वये मान्यता मिळाली असुन त्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

१) महानगरपालिका मालकीचे श्री.छत्रपती शाहु महाराज रुग्णालयाचे एकुण भुक्षेत्रफळ ५९६९.४०चौ.मी असुन पहिला मजला बांधकाम क्षेत्रफळ १४७२.४२ व दुसरा मजला १४८६.३६ चौ.मी.असे एकुण बांधकाम क्षेत्रफळ २९५८.७८चौ.मी.असे आहे.प्रस्तावित कामी संस्थेस रुग्णालय वापराकामी देतांना सध्या रुग्णालयामार्फत सुरु असेलेल्या सेवा जसे प्रसुतीगृह,बाहयरुग्ण कक्ष या सेवा सध्या मनपा देते त्या दरातच व त्याच पध्दतीने दयाव्या लागतील. तसेच इतर राष्ट्रीय कार्यक्रम राबविणे कामी दवाखाने विभागासाठी जागा उपलब्ध ठेवणे आवश्यक राहील.संबंधीत संस्थेस दवाखाना चालविण्यासाठी लागणारा मनुष्यबळ ( उदा. डॉक्टर्स, नर्सेस व इतर स्टाफ ) , मशिनरी , फर्निचर इत्यादी संबंधीत संस्थेचे राहतील.

२) सदर संस्थेला सध्यस्थितीत मनपाकडून दिल्या जाणाऱ्या सेवा (प्रसुतीगृह , बाहयरूग्ण विभाग, इतर सर्व प्रकारचे राष्ट्रीय कार्यक्रम व रूग्णवाहिका ) शासनाने ठरविलेल्या दरात उपलब्ध करून दयावे लागतील. प्रसुतीगृह व बाहयरुग्ण कक्षामधील येणारे रुग्ण तपासणी करीता लागणारे पाणी व विद्युत पुरवठा हा महानगरपालिके मार्फत संस्थेस विनामुल्य उपलब्ध करुन दिला जाईल. तसेच भविष्यात शासनाकडून वेळोवेळी येणाऱ्या सुचनांचा तंतोतंत पालन सदर संस्थेला करावे लागेल.

३) सदर संस्थेला नविन काही सेवा उपलब्ध करून दयावयाचे असल्यास उदा. सीटीस्कॅन,एम.आर.आय इत्यादी सदर सेवाचे दर ना नफा ना तोटा या किंवा अल्पदरात या तत्वावर पुरविण्यात याव्यात. याचे दर मनपा आयुक्त समिती स्थापन करुन त्याद्वारे ठरवतील.

४) सदर संस्थेला सदर जागेवर काही नविन बांधकाम , नविन कार्य करावयाचे असल्यास ती मनपाच्या नियमानूसार व मा.आयुक्त सो. यांचे परवानगी घेणे आवश्यक होईल.

५) उपचार करित असतांना पेशंटची सर्वस्वी जबाबदारी सदर संस्थेची राहील त्यास मनपा जबाबदार राहणार नाही.

६) सदर जागेचा इलेक्ट्रिक बिल,टेलिफोन बिल, इतर सर्व प्रकारची बिले/कर सदर संस्थेने देणे बंधनकारक राहतील.

७) दिलेल्या प्रयोजनासाठीच सदर जागेचा उपयोग करता येईल.

८) सदर जागेचे काही नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील व त्याची नियमानुसार भरपाई करावी लागेल.इमारतीची देखभाल/दुरूस्ती मनपाचे परवानगीने सदर संस्थेने करावयाची आहे.

९) करारनाम्यावरील अटी व शर्तीचा भंग झाल्यास जागा रिकामी करून घेण्याचा अधिकार मनपास राहील. तसेच सहा महिना अगोदर मनपास करारनामा संपत असलेबाबत सुचित करावे व मुदतीत जागा रिकामी करून दयावी. तसे न झाल्यास संस्थेस करारनाम्याचा भंग केल्याप्रकरणी कारवाईस पात्र धरता येईल.

१०) सदर जागेतील देखभाल दुरूस्ती सदर संस्थेस करणे बंधनकारक राहील.

११) सदर संस्थेबाबत जर गंभीर स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास तक्रार शहानिशाअंती संस्था दोषी आढळल्यास जागा केव्हाही खाली करून घेण्याचा अधिकार मा.आयुक्त साो.व पदाधिकारी यांच्याशी चर्चा करुन दिलेला निर्णय हा निर्णय अंतीम राहील व तो संस्थेवर बंधनकारक राहील.

१२) म.न.पा.ने दिलेला निर्णय अंतीम राहील व तो संस्थेवर बंधनकारक राहील.

१३) वरील अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त साो. यांना राहतील.

१४) संस्थेस सदर जागा हि ३० वर्षे कालावधीसाठी देणे आहे.

१५) मनपा इमारतीचे भाडे भरणे किंवा त्या बदल्यात त्या किमतीच्या किंवा त्यापेक्षा जास्त रकमेच्या सेवा मोफत देणे याबाबतचा तपशिल .

तरी इच्छुक असलेल्या सेवाभावी संस्थांनी/व्यक्तींनी दिनांक १९ जून २०१७ पर्यंत संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

**उपायुक्त**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**